या समवेत:- गुरुवार दिनांक- ०२/०७/२०२६ रोजी सकाळी ११ .०० वा. प्राप्त झालेल्या अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या,स्थायी समिती सभेचे कामकाज कार्यवृत्त जोडले आहे.

---

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि-१/परिषद/स्थायी सभा/३६९/२०२६
अहिल्यानगर, दिनांक१० / ८ /२०२६

प्रत माहितीसाठी सादर,

१. मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर
२. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, अहिल्यानगर
३. मा.प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, अहिल्यानगर
४. खाते प्रमुख सर्व

२/-आपल्या खात्यासंबंधी विषय व त्याबाबतचे ठरावासंबंधी, तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चेत उपस्थित केलेल्या प्रत्येक मुददयावर उचित कार्यवाही करुन त्याचा अनुपालनचा लेखी अहवाल सामान्य प्रशासन विभागास त्वरीत पाठवावा,म्हणजे पुढील स्थायी समिती सभेस अनुपालन सादर करता येईल.

(राहुल शेळके)
सचिव,स्थायी समिती सभा तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ०२/०७/२०२६ रोजी सकाळी ११ .०० वा. सभेचे कार्यवृत्त

हजर अधिकारी

| अ.क्र. | नाव | अ.क्र | नाव |
|---|---|---|---|
| १ | मा.श्री.आनंद भंडारी, प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | २ | मा.विजय मुळीक<br>अति.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३ | श्री.राहुल शेळके सचिव स्थायी समिती तथा,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) | ४ | श्री.शैलेश मोरे<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ५ | श्री दादाभाऊ गुंजाळ<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.) | ६ | श्री.राजेंद्र देसले<br>प्रकल्प संचालक जलजीवन मिशन |
| ७ | श्री संजय कदम प्रभारी<br>जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक) | ८ | श्री सागर चौधरी<br>कार्यकारी अभियंता (सा.बां.दक्षिण) |
| ९ | श्री.बाळासाहेब ननवरे<br>कार्यकारी अभियंता (सा.बां.उत्तर) | १० | श्री.सुभाष सातपुते<br>प्र.उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो) |
| ११ | श्री.डपकर शिवम<br>प्रभारी जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल.पा) | १२ | श्री एच.बी.चव्हाण<br>कार्यकारी अभियंता,(ग्रा.पा.पु.) |
| १३ | श्री सुधीर शिंदे<br>कृषि विकास अधिकारी | १४ | डॉ.श्री दशरथ दिघे<br>जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अहिल्यानगर |
| १५ | डॉ.श्री बापूसाहेब नागरगोजे<br>जिल्हा आरोग्य अधिकारी | १६ | श्री.भास्कर पाटील<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) |
| १७ | श्रीम संध्या गायकवाड<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | १८ | श्री देविदास कोकाटे<br>जिल्हा समाज कल्याण अधिकारी |
| १९ | श्री बाबासाहेब घोरपडे<br>उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी | २० | श्री. निखिल पठारे<br>प्र.उप अभियंता (भु.स.वि.यो.) |
| २१ | श्री बाळासाहेब बुगे<br>शिक्षणाधिकारी (योजना) | | |

**विषय क्रमांक १:-** दिनांक ०२/०६/२०२६ रोजीची स्थायी समिती सभा पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत वाचुन कायम करणे.

**ठराव क्र २३२:-** दिनांक ०२/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा.पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत कायम करणे व संबंधित खात्याने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेत येऊन त्यावर महत्वाचे कार्यवाहीच्या मुद्यावर संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन त्यांची नोंद घेणेत आली.संबंधित सर्व खातेप्रमुखांनी सभेतील कामकाजानुसार तातडीने उचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

**विषय क्रमांक २:-** मौजे शिराढोण ता. जि. अहिल्यानगर येथे उंच पाण्याची टाकी बांधणे कामास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी स्थायी समितीची मंजुरी मिळणे बाबत

प्रस्तावना - मौजे शिराढोण ता जि अहिल्यानगर येथे राष्ट्रीय महामार्ग क्र ५१६ अ च्या रुंदीकरणामुळे बुरानगर व इतर ४४ गावांच्या योजनेतील मौजे शिराढोण ता. जि. अहिल्यानगर येथे उंच पाण्याची टाकी बाधित होत असल्याने टाकी काढून टाकणे गरजेचे आहे. त्यासाठी राष्ट्रीय महामार्गाच्या प्रकल्प अधिकारी यांनी जिल्हा परिषदेला नवीन टाकी बांधण्यासाठी आवश्यक रक्कम रुपये ५१२२३३७/- इतकी वर्ग केली असून त्या निधीमधून मौजे शिरढोण ता जि अहिल्यानगर येथे १२०००० लीटर क्षमतेची आरसीसी उंच पाण्याची टाकी आनुषंगिक कामसाहित अंदाजपत्रक उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग नागर यांनी या कार्यालयास सादर केले आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु ५१२२३३७/- इतकी असून सदर कामास मा. अध्यक्ष, स्थायी समिती जिल्हा परिषद हे प्रशासकीय मान्यता देणेस सक्षम आहेत.

नियमातील तरतूद - ग्रामविकास विभागांकडील शासन निर्णय क्र झेडपीए-२०२१/प्रक्र.५६/वित्त-९ दि. ०६/०९/२०२६ अन्वये मा. अध्यक्ष, स्थायी समिती जिल्हा परिषद सक्षम आहेत.

विभागाचे अभिप्राय - ग्रामविकास विभागांकडील शासन निर्णय क्र झेडपीए-२०२१/प्रक्र.५६/वित्त-९ दि. ०६/०९/२०२६ अन्वये मा. अध्यक्ष, स्थायी समिती जिल्हा परिषद सक्षम आहेत.

**ठराव क्र २३३:-** मौजे शिराढोण ता जि अहिल्यानगर येथे राष्ट्रीय महामार्ग क्र ५१६ अ च्या रुंदीकरणामुळे बु-हाणनगर व इतर ४४ गावांच्या योजनेतील मौजे शिराढोण ता. जि. अहिल्यानगर येथे उंच पाण्याची टाकी बाधित होत असल्याने टाकी काढून टाकणे गरजेचे आहे. त्यासाठी राष्ट्रीय महामार्गाच्या प्रकल्प अधिकारी यांनी जिल्हा परिषदेला नवीन टाकी बांधण्यासाठी आवश्यक रक्कम रुपये ५१२२३३७/- इतकी वर्ग केली असून त्या निधीमधून मौजे शिरढोण ता जि अहिल्यानगर येथे १२०००० लीटर क्षमतेची आरसीसी उंच पाण्याची टाकी आनुषंगिक कामसाहित अंदाजपत्रक उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग नागर यांनी या कार्यालयास सादर केले आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु ५१२२३३७/- इतकी असून सदर कामास या ठरावाद्वारे सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे.

**विषय क्रमांक ३:-** जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागांतर्गत खालील पुर्ण झालेल्या कामाचे लेखापरिक्षण होऊन सदर कामाचे सुरक्षा अनामत देयकांची संबंधीतांनी मागणी केलेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | एजन्सीचे नाव | रक्कम | प्रमाणक क्रमांक व दिनांक | मो.पु.क्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | तळेगाव (पाडेकर मळा) ता.संगमनेर येथे साठा बंधारा बांधणे | श्री.वाय.एस.कांदळकर मु.पो.तळेगाव दिघे ता.संगमनेर | ६४६३/-<br>३८०३/-<br>४४७८/- | प्र.क्र.१५२१ दि.३१/०३/२००८<br>प्र.क्र.१५२२ दि.३१/०३/२००८<br>प्र.क्र.१५२३ दि.३१/०३/२००८ | ८२६ |

उपरोक्त नमुद कामांची सुरक्षा अनामतची रक्कम ही तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने सदरची रक्कम अर्थ विभागाने व्यपगत केलेली आहे. सदरची अनामत रक्कम व्यपगत केले असल्याने त्यास म.जि.प.पं.स. लेखासंहिता १९६८ नियम २१९ अन्वये तीन वर्षावरील अनामत रक्कम अदा करण्यास स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. तथापी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडील आदेश क्रसाप्रवि.१/परिषद/३३४/२०२२ दि.२८/०३/२०२२ अन्वये प्रशासक कालावधीत जिल्हा परिषद/ पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील विविध विकास कामे व योजना अंमलबजावणीसाठी निर्णय घेणेकामी स्थायी समितीचे सर्व अधिकार प्रशासक म्हणुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना प्राप्त झालेले आहेत.

<u>नियमाची तरतुद</u>-: महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम क्र.२१९

<u>विभागाचे अभिप्राय</u>-: जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभागाकडील तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या पुर्ण कामाचा अर्थ खात्याने व्यपगत केलेल्या सुरक्षा अनामतच्या रक्कमा ठेकेदारास परत करावयाचे असल्याने स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक आहे तथापी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासन जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील आदेश क्र.साप्रवि१/परिषद/३३४/२०२२ दि.२८/०३/२०२२ अन्वये प्रशासक कालावधीत जिल्हा परिषद/ पंचायत सतिमी व ग्रामपंचायत स्तरावरील विविध विकास कामे व योजना अंमलबजावणीसाठी निर्णय घेणेकामी स्थायी समितीचे सर्व अधिकार प्रशासक म्हणुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना प्राप्त झालेले असल्याने सदर विषयी मा.मुख्य

कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सदरची व्यपगत केलेली रक्कम स्थानिक निधी लेखा परिक्षणामध्ये वसुली दर्शविण्यात आलेली असल्यास सदरची रक्कम वसुल करुन उर्वरीत रक्कम अदा करणेस हरकत नसुन स्थायी समिती सभेच्या अनुषंगाने प्रशासन म्हणुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांचे मान्यतेस्तव सविनय सादर

**<u>ठराव क्र २३४:-</u>** जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागांतर्गत खालील पुर्ण झालेल्या कामाचे लेखापरिक्षण होऊन सदर कामाचे सुरक्षा अनामत देयकांची संबंधीतांनी मागणी केलेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | एजन्सीचे नाव | रक्कम | प्रमाणक क्रमांक व दिनांक | मो.पु.क्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | तळेगाव (पाडेकर मळा) ता.संगमनेर येथे साठा बंधारा बांधणे | श्री.वाय.एस.कांदळकर मु.पो.तळेगाव दिघे ता.संगमनेर | ६४६३/-<br>३८०३/-<br>४४७८/- | प्र.क्र.१५२१ दि.३१/०३/२००८<br>प्र.क्र.१५२२ दि.३१/०३/२००८<br>प्र.क्र.१५२३ दि.३१/०३/२००८ | ८२६ |

उपरोक्त नमुद कामांची सुरक्षा अनामतची रक्कम ही तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने सदरची रक्कम अर्थ विभागाने व्यपगत केलेली आहे. सदरची अनामत रक्कम व्यपगत केलेली असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम क्र.२१९ अन्वये तीन वर्षावरील अनामत रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>विषय क्रमांक ४ :-</u>** जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत लेखाशिर्ष ३०५४-३०६८ ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण अंतर्गत रस्त्यांच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

प्रस्तावना - जिल्हा नियोजन समितीकडील रस्ते क्षेत्रासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत लेखाशिर्ष ३०५४-३०६८ ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण या योजनेसाठी जिल्हा परिषद अहिल्यानगर (बांधकाम उत्तर व दक्षिण विभाग एकत्रित) साठी मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद रक्कम ८८००.०० लक्ष इतकी असून दायीत्वाची रक्कम वजा जाता मंजूर वाव दिडपटीत रक्कम रुपये ११२७४.५६ लक्ष होत आहे. सदर तरतुदीच्या अनुषंगाने मा. पालकमंत्री महोदय यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा नियोजन

समिती कार्यालयाने वेळोवेळी केलेल्या पत्रव्यवहाराच्या मर्यादेत राहून वार्षिक कृती आराखडा व प्राधान्यक्रम यादी निश्चित करून प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सूचित करण्यात आली आहे.

शासन निर्णय क्र जिवायो -२०१५ /प्रक्र १९१ /पं रा ८ दि.०३ सप्टेंबर २०१६ अन्वये जिल्हा परिषदे अंतर्गत तालुका स्तरावर पी.सी.आय.आधारे वेगवेगळ्या प्राधान्य क्रम याद्या तयार करणे तसेच निधी उपलब्धते नुसार कार्यकारी अभियंता पी.एम.जि.एस.वाय. यांचे कडील प्राधान्य क्रम यादी व योजनेंतर्गत मंजूर / प्रस्तावित रस्ते वगळून उर्वरित रस्त्यांपैकी प्राधान्यक्रम यादी नुसार पात्र रस्ते निवडलेले आहेत. त्यानुसार रस्त्यांची सध्यस्थिती, ग्रामस्थांची मागणी व दुरुस्तीची निकड, वाहतुकीची वर्दळ व मा. पालकमंत्री महोदय यांची मागणी लक्षात घेता प्राधान्य क्रमानुसार पी.सी.आय. १ असलेले रस्ते मजबुतीकरन व डांबरीकरण करणेसाठी खालील प्रमाणे जि.प.सा.बां.उत्तर विभागाकडील रस्त्यांच्या कामांचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार उपविभागीय स्तरावर प्राधान्यक्रम ठरवून एकूण ०६ कामे रक्कम रु. ४५०.०० लक्ष च्या कामास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

| अ.क्र. | तालुका | रस्त्याचे / कामाचे नाव (PCI अहवालानुसार) | कामाची किंमत (रु.लक्ष मध्ये) | रु. अक्षरी |
|---|---|---|---|---|
| १ | राहाता | कनकुरी (इजिमा९) ते तालुका हद्द रस्ता (ग्रामा १११) कि.मी. ०/०० ते ३/५०० रस्ता मजबुतीकरण करणे. | ७५.०० | पंच्याहत्तर लक्ष |
| २ | राहाता | राजुरी कोल्हार रस्ता ते शेळके वस्ती तालुका हद्द रस्ता ( ग्रामा १२५) कि.मी.०/०० त २/०० रस्ता मजबुतीकरण करणे. | ७५.०० | पंच्याहत्तर लक्ष |
| ३ | राहाता | गोगलगाव ते पडवळ वस्ती (गायकर लवण) तालुका हद्द कि.मी ०/०० ते २/०० रस्ता मजबुतीकरण करणे.(ग्रामा ९२) | ७५.०० | पंच्याहत्तर लक्ष |
| ४ | राहाता | रामा ५० ते कळमकरवाडी (ग्रामा १५१) कि.मी ०/०० ते १/२०० रस्ता मजबुतीकरण करणे. | ७५.०० | पंच्याहत्तर लक्ष |
| ५ | राहाता | ममदापुर ते म्हैसमळा ते इजिमा ६३ रस्ता (ग्रामा ७०) कि.मी ०/५०० ते २/५०० रस्ता मजबुतीकरण करणे. | ७५.०० | पंच्याहत्तर लक्ष |
| ६ | संगमनेर | प्रजिमा २६ ते खळी रस्ता ग्रामा ५८ रस्ता मजबुतीकरण करणे (०.०० किमी ते ४.०० किमी) (ग्रामा-५८ दाढ खुर्द ते खळी कांगणवाडी रस्ता ता. संगमनेर जि अहिल्यानगर) | ७५.०० | पंच्याहत्तर लक्ष |
| | | एकूण रक्कम | ४५०.०० | चारशे पन्नास लक्ष मात्र |

**नियमातील तरतूद** - महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए -२०१६ /प्रक्र.५६ /वित्त-९ दिनांक ०७ ऑक्टोबर २०१७ व दिनांक ०६ सप्टेंबर २०२१ मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार वरील यादीतील प्रस्तावित काम अ.क्र. १ ते ६ या कामांची प्रत्येकी रक्कम ६०.०१ ते ७५.०० या मर्यादेत असल्याने प्रशासकीय मंजुरी देणेस मा. स्थायी समिती (जिल्हा परिषद अहिल्यानगर) सक्षम प्राधिकारी आहेत.

तथापि,महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील राजपत्र दि. १३/०९/२०२२ नुसार जिल्हा परिषद अहिल्यानगर कार्यकाल दि. २०/०३/२०२२ रोजी संपुष्टात आलेला असल्याने जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती यांची पदे एकाच वेळी रिक्त झाली आहेत. त्यामुळे अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी दि. २०/०३/२०२२ पासून ते जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती यांची पदे निवडणुकीव्दारे भरले जातील तोपर्यंत प्राधिकृत (प्रशासक म्हणून) करण्यात आलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय** -

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ मध्ये ३०५४-३०६८ ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण अंतर्गत रस्ते मजबुतीकरणाच्या कामांची किंमत ६०.०१ ते ७५.०० लक्ष मर्यादेत असल्याने वरील ०६ कामांना (एकूण रक्कम रु. ४५०.०० लक्ष) प्रशासकीय मान्यता देणेस हरकत नाही.

सदर विषयाचे पारूप मा. प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मंजुरीसाठी सविनय सादर केले आहे. मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्र २३५:-** जिल्हा नियोजन समितीकडील रस्ते क्षेत्रासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत लेखाशिर्ष ३०५४-३०६८ ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण या योजनेसाठी जिल्हा परिषद अहिल्यानगर (बांधकाम उत्तर व दक्षिण विभाग एकत्रित) साठी मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद रक्कम ८८००.०० लक्ष इतकी असून दायीत्वाची रक्कम वजा जाता मंजूर वाव दिडपटीत रक्कम रुपये ११२७४.५६ लक्ष होत आहे.

सदर तरतुदीच्या अनुषंगाने मा. पालकमंत्री महोदय यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा नियोजन समिती कार्यालयाने वेळोवेळी केलेल्या पत्रव्यवहाराच्या मर्यादेत राहून वार्षिक कृती आराखडा व प्राधान्यक्रम यादी निश्चित करून प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सूचित करण्यात आली आहे.

मा. ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री. जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) तथा पालकमंत्री अहिल्यानगर जिल्हा यांनी २०२६-२७ करिता ३०५४- ३०६८ ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण अंतर्गत जिल्हा परिषदेस मंजूर असलेल्या अनुदानातून जि.प.सा.बां. उत्तर विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांच्या एकुण ०६ कामे रक्कम रु. ४५०.०० लक्ष च्या कामांना प्रशासकीय मंजुरी देऊन निधीची मागणी करणे बाबत कळविणेत आलेले आहे.

शासन निर्णय क्र जिवायो -२०१५ /प्रक्र १९१ /पं रा ८ दि.०३ सप्टेंबर २०१६ अन्वये उपविभागीय स्तरावर प्राधान्यक्रम ठरवून एकूण ०६ कामे रक्कम रु. ४५०.०० लक्ष च्या कामास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव सादर करणेत येत आहे. वरील यादीतील प्रस्तावित काम अ.क्र. १ ते ७ या कामांची प्रत्येकी रक्कम ६०.०१ ते ७५.०० लक्ष पर्यंतच्या मर्यादेत असल्याने शासन निर्णय क्र -२०१६ /प्रक्र.५६ /वित्त-९ दिनांक ०६ सप्टेंबर २०२१ अन्वये प्रशासकीय मंजुरी देणेस मा. स्थायी समिती जि.प.अहिल्यानगर हे सक्षम प्राधिकारी आहेत.

| अ.क्र. | तालुका | रस्त्याचे / कामाचे नाव (PCI अहवालानुसार) | कामाची किंमत (रु.लक्ष मध्ये) | रु. अक्षरी |
|---|---|---|---|---|
| १ | राहाता | कनकुरी (इजिमा ९) ते तालुका हद्द रस्ता (ग्रामा १११) कि.मी. ०/०० ते ३/५०० रस्ता मजबुतीकरण करणे. | ७५.०० | पंच्याहत्तर लक्ष |
| २ | राहाता | राजुरी कोल्हार रस्ता ते शेळके वस्ती तालुका हद्द रस्ता ( ग्रामा १२५) कि.मी.०/०० त २/०० रस्ता मजबुतीकरण करणे. | ७५.०० | पंच्याहत्तर लक्ष |
| ३ | राहाता | गोगलगाव ते पडवळ वस्ती (गायकर लवण) तालुका हद्द कि.मी ०/०० ते २/०० रस्ता मजबुतीकरण करणे.(ग्रामा ९२) | ७५.०० | पंच्याहत्तर लक्ष |
| ४ | राहाता | रामा ५० ते कळमकरवाडी (ग्रामा १५१) कि.मी ०/०० ते १/२०० रस्ता मजबुतीकरण करणे. | ७५.०० | पंच्याहत्तर लक्ष |
| ५ | राहाता | ममदापुर ते म्हैसमळा ते इजिमा ६३ रस्ता (ग्रामा ७०) कि.मी ०/५०० ते २/५०० रस्ता मजबुतीकरण करणे. | ७५.०० | पंच्याहत्तर लक्ष |
| ६ | संगमनेर | प्रजिमा २६ ते खळी रस्ता ग्रामा ५८ रस्ता मजबुतीकरण करणे (०.०० किमी ते ४.०० किमी) (ग्रामा-५८ दाढ खुर्द ते खळी कांगणवाडी रस्ता ता. संगमनेर जि अहिल्यानगर) | ७५.०० | पंच्याहत्तर लक्ष |
| | | एकूण रक्कम | ४५०.०० | चारशे पन्नास लक्ष मात्र |

या ठरावा नुसार वरील ०६ कामांना रकाना क्र. ४ मध्ये दर्शविलेल्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्रमांक ५ :-** जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत लेखाशिर्ष ३०५४-३३९१ इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण अंतर्गत रस्त्यांच्या कामांच्या प्राधान्यक्रम (P.C.I.) यादीस व कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

प्रस्तावना -

जिल्हा नियोजन समितीकडील रस्ते क्षेत्रासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत लेखाशिर्ष ३०५४-३३९१ इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण या योजनेसाठी संदर्भ क्र. २ नुसार जिल्हा परिषद अहिल्यानगर (बांधकाम उत्तर व दक्षिण विभाग एकत्रित) साठी मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद रक्कम रुपये ३०००.०० लक्ष इतकी असून दायीत्वाची रक्कम वजा जाता मंजूर वाव दिडपटीत रक्कम रुपये ३५०१.७४ लक्ष कळविण्यात आलेली आहे. सदर तरतुदीच्या अनुषंगाने मा. पालकमंत्री महोदय यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा नियोजन समिती कार्यालयाने वेळोवेळी केलेल्या पत्रव्यवहाराच्या मर्यादेत राहून वार्षिक कृती आराखडा व प्राधान्यक्रम यादी निश्चित करून प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सूचित करण्यात आली आहे.

शासन निर्णय क्र जिवायो -२०१५ /प्रक्र १९१ /पं रा ८ दि.०३ सप्टेंबर २०१६ अन्वये जिल्हा परिषदे अंतर्गत तालुका स्तरावर पी.सी.आय.आधारे वेगवेगळ्या प्राधान्य क्रम याद्या तयार करणे तसेच निधी उपलब्धते नुसार कार्यकारी अभियंता पी.एम.जि.एस.वाय. यांचे कडील प्राधान्य क्रम यादी व योजनेंतर्गत मंजूर / प्रस्तावित रस्ते वगळून उर्वरित रस्त्यांपैकी प्राधान्यक्रम यादी नुसार पात्र रस्ते निवडलेले आहेत. त्यानुसार रस्त्यांची सध्यस्थिती, ग्रामस्थांची मागणी व दुरुस्तीची निकड, वाहतुकीची वर्दळ व मा. पालकमंत्री महोदय यांची मागणी लक्षात घेता प्राधान्य क्रमानुसार पी.सी.आय. १ असलेले रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणेसाठी खालील प्रमाणे जि.प.सा.बां.उत्तर विभागाकडील रस्त्यांच्या कामांचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार उपविभागीय स्तरावर प्राधान्यक्रम ठरवून एकूण ०२ कामे रक्कम रु. १२०.०० लक्ष च्या कामास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

| अ.क्र. | तालुका | रस्त्याचे / कामाचे नाव (PCI अहवालानुसार) | कामाची किंमत (रु.लक्ष मध्ये) | रु. अक्षरी |
|---|---|---|---|---|
| १ | संगमनेर | शेदगाव फाटा ते मालुंजे डिग्रस रस्ता इजिमा ३४२ मजबुतीकरण करणे. (४/०० ते ७/०० किमी) (इजिमा- ३४२-शेडगाव मालुंजे डिग्रस रणखांबवाडी कौठे मलकापूर रामा ६६ वरवंडी खांबे ते तालुका हद्द ता. संगमनेर) | ७५.०० | पंच्याहत्तर लक्ष |
| | | एकूण रक्कम | ७५.०० | पंच्याहत्तर लक्ष |

नियमातील तरतूद -

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए -२०१६ /प्रक्र.५६ /वित्त-९ दिनांक ०७ ऑक्टोबर २०१७ व दिनांक ०६ सप्टेंबर २०२१ मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार वरील यादीतील प्रस्तावित काम अ.क्र. १ या कामाची रक्कम १५.०१ ते ५०.०० लक्ष या मर्यादेत असल्याने प्रशासकीय मंजुरी देणेस मा. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद अहिल्यानगर) सक्षम प्राधिकारी आहेत.

वरील यादीतील प्रस्तावित काम अ.क्र.१ या कामाची रक्कम रु. ६०.०१ ते ७५.०० लक्ष या मर्यादेत असल्याने प्रशासकीय मंजुरी देणेस जि.प.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि,महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील राजपत्र दि. १३/०९/२०२२ नुसार जिल्हा परिषद अहिल्यानगर कार्यकाल दि. २०/०३/२०२२ रोजी संपुष्टात आलेला असल्याने जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती यांची पदे एकाच वेळी रिक्त झाली आहेत. त्यामुळे अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी दि. २०/०३/२०२२ पासून ते जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती यांची पदे निवडणुकीव्दारे भरले जातील तोपर्यंत प्राधिकृत (प्रशासक म्हणून) करण्यात आलेले आहे.

विभागाचा अभिप्राय -

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ मध्ये ३०५४-३३९१ इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण अंतर्गत रस्ते मजबुतीकरणाच्या कामांची किंमत ६०.०१ ते ७५.०० लक्ष मर्यादेत असल्याने वरील ०१ कामांना (एकूण रक्कम रु. ७५.०० लक्ष) प्रशासकीय मान्यता देणेस हरकत नाही.

सदर विषयाचे पारूप मा. प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मंजुरीसाठी सविनय सादर केले आहे. मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्र २३६:-** जिल्हा नियोजन समितीकडील रस्ते क्षेत्रासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत लेखाशिर्ष ३०५४-३३९१ इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण या योजनेसाठी जिल्हा परिषद अहिल्यानगर (बांधकाम उत्तर व दक्षिण विभाग एकत्रित) साठी मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद रक्कम रुपये ३०००.०० लक्ष इतकी असून दायीत्वाची रक्कम वजा जाता मंजूर वाव दिडपटीत रक्कम रुपये ३५०१.७४ लक्ष कळविण्यात आलेली आहे. सदर तरतुदीच्या अनुषंगाने मा. पालकमंत्री महोदय यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा नियोजन समिती कार्यालयाने वेळोवेळी केलेल्या पत्रव्यवहाराच्या मर्यादेत राहून वार्षिक कृती आराखडा व प्राधान्यक्रम यादी निश्चित करून प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सूचित करण्यात आली आहे.

मा. ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री. जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ ) तथा पालकमंत्री अहिल्यानगर जिल्हा यांनी २०२६-२७ करिता ३०५४-३३९१ इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण अंतर्गत जिल्हा परिषदेस मंजूर असलेल्या अनुदानातून जि.प.सा.बां. उत्तर विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांच्या एकुण ०१ काम रक्कम रु. ७५.०० लक्ष च्या कामांना प्रशासकीय मंजुरी देऊन निधीची मागणी करणे बाबत कळविणेत आलेले आहे.

शासन निर्णय क्र जिवायो -२०१५ /प्रक्र १९१ /पं रा ८ दि.०३ सप्टेंबर २०१६ अन्वये उपविभागीय स्तरावर प्राधान्यक्रम ठरवून एकूण ०१ काम रक्कम रु. ७५.०० लक्ष च्या कामास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव सादर करणेत येत आहे. वरील यादीतील प्रस्तावित काम अ.क्र. १ या कामाची प्रत्येकी रक्कम ६०.०१ ते ७५.०० लक्ष पर्यंतच्या मर्यादेत असल्याने शासन निर्णय क्र -२०१६ /प्रक्र.५६ /वित्त-९ दिनांक ०६ सप्टेंबर २०२१ अन्वये प्रशासकीय मंजुरी देणेस मा. स्थायी समिती जि.प.अहिल्यानगर हे सक्षम प्राधिकारी आहेत.

| अ.क्र. | तालुका | रस्त्याचे / कामाचे नाव (PCI अहवालानुसार) | कामाची किंमत (रु.लक्ष मध्ये) | रु. अक्षरी |
|---|---|---|---|---|
| १ | संगमनेर | शेडगाव फाटा ते मालुंजे डिग्रस रस्ता इजिमा ३४२ मजबुतीकरण करणे. (४/०० ते ७/०० किमी) (इजिमा- ३४२-शेडगाव मालुंजे डिग्रस रणखांबवाडी कौठे मलकापूर रामा ६६ वरवंडी खांबे ते तालुका हद्द ता. संगमनेर) | ७५.०० | पंच्याहत्तर लक्ष |

या ठरावा नुसार वरील ०१ कामास रकाना क्र. ४ मध्ये दर्शविलेल्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**<u>विषय क्रमांक ६:-</u>** जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२६-२७ मध्ये लेखाशिर्ष २२१०- । ७१९ नियतव्यय मंजूर झाल्याप्रमाणे रु.५०.०० लक्ष, मंजुर अनुदानातुन प्राथमिक आरोग्य केंद्राचे /उपकेंद्राचे /आयुर्वेदिक व युनानी दवाखान्याचे बळकटीकरण करणे या योजनेअंतर्गत आवश्यक साहित्य साधन सामुग्री, उपकरणे ,लिनन साहित्य ई. खरेदी खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**-अहिल्यानगर जिल्हा परिषद आरोग्य विभागांतर्गत आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रामध्ये एकूण १०६ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ५९२ उपकेंद्रे २ आयुर्वेदिक दवाखाने,व पाच प्राथमिक आरोग्य पथके कार्यान्वीत आहेत. सदर आरोग्य संस्थामार्फत ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा देण्याचे काम चालु आहे.

जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२६-२७ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राचे /उपकेंद्राचे /आयुर्वेदिक व युनानी दवाखान्याचे बळकटीकरण करणे या योजनेअंतर्गत **२२१०- । ७१९** लेखाशिर्षांतर्गत रक्कम रु.५० लक्ष इतका नियतव्यय मा.जिल्हा नियोजन अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,अहिल्यानगर या कार्यालयाकडील नियतव्यय मंजूर पत्र जा.क्र./जिवायो/२६-२७/अर्थसंकल्प तरतूद/संस अ /२/७७७/२०२६ दिनांक-०८/०५/२०२६ नुसार खालील प्रमाणे नियतव्यय मंजुर केलेला आहे.

तक्ता अ-

| अ.क्रं | बाब | शासकीय लेखाशिर्ष | मंजूर नियतव्यय सन २०२६-२७ |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक आरोग्य केंद्राचे /उपकेंद्राचे /आयुर्वेदिक व युनानी दवाखान्याचे बळकटीकरण | २२१०-। ७१९ | रु ५०.०० लक्ष |

सदर पत्रानुसार प्रशासकीय मान्यता घेण्यात येऊन निधी मागणी करण्याबाबत सूचना प्राप्त असल्याने झालेल्या आहेत.

उपरोक्त अनुदानातून प्रा.आ.केंद्र व उपकेंद्र आयुर्वेदिक व युनानी दवाखाने ई .आरोग्य संस्थांच्या ठिकाणी आवश्यक साहित्य साधन सामुग्री, यंत्रसामुग्री उपकरणे,लिनन साहित्य ई .बाबी खरेदीची गरज भांडार विभागातील शिल्लक साठा मा.संचालक स्तरावरून होणारा पुरवठा व भौगोलिक परिस्थिती ई.बाबींचा विचार करून अनुदान प्राप्त झालेनंतर ,मा.उपसंचालक,आरोग्य सेवा,नाशिक मंडळ,नाशिक यांनी दिलेल्या तांत्रिक मान्यतेनुसारच व वेळोवेळी निर्गमित केलेल्या खरेदी धोरणानुसार ,साहित्य साधन सामुग्री, उपकरणे ,लिनन साहित्य ,ई .खरेदीची कार्यवाही करण्यात येऊन मागणीनुसार प्राथमिक आरोग्य केंद्रांना /उपकेंद्रांना आणि आयुर्वेदिक व युनानी दवाखान्यांना ,साहित्य साधन सामुग्री, उपकरणे ,लिनन साहित्य हॉस्पिटल युक्त आवश्यक फर्निचर,ई . बाबींचा पुरवठा मागणीनुसार करण्यात येईल .

सदर योजनेस प्रशासकीय मान्यता घेणेसाठी महाराष्ट्र शासन ,ग्रामविकास विभाग ,शा.नि.क्र . झेपिए -२०१६/प्र .क्र . ५६/वित्त-९ मुंबई ३२ दिनांक -०७/१०/२०१७ अन्वये मा .जिल्हा परिषद **स्थायी समिती सभा** सभा सक्षम आहे .

तथापि,महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग राजपत्र असाधारण क्र . २६ दिनांक ११ मार्च २०२२ अन्वये कार्यकाल दिनांक २०/०३/२०२२ रोजी संपुष्टात आला आहे .त्यामध्ये जिल्हा परिषद अ.नगर चा समावेश आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग ,मुंबई १ जा.क्र. सा.प्र.वि १/परिषद /३३४/२०२२ अ.नगर दिनांक २८/०३/२०२२ अन्वये प्रशासक कालावधीत जिल्हा परिषद स्तरावरील विविध विकास कामे व योजना अंबलबजावणीसाठी निर्णय घेण्यासाठी विविध स्तरांवर सल्लागार समिती नियुक्ती केली आहे .तरी सदरच्या विषयास प्रशासकीय मान्यतेस्तव मा. जिल्हा परिषद **स्थायी** सल्लागार समिती सभेसमोर सविनय सादर

**ठराव क्र २३७:-** उपरोक्त नमूद केलेल्या तक्ता अ मधील जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२६-२७ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राचे /उपकेंद्राचे /आयुर्वेदिक व युनानी दवाखान्याचे बळकटीकरण करणे या योजनेअंतर्गत २२१०-। ७१९ लेखाशिर्षांतर्गत रक्कम रु.५० लक्ष आवश्यक साहित्य साधन सामुग्री, उपकरणे,लिनन साहित्य ई. खरेदी खर्चास प्रशासकीय मान्यतास्तव सदर विषयास मंजुरी घेणेस्तव विभागामार्फत विषय सादर करण्यात आलेला असून, सामान्य प्रशासन विभाग,मुंबई १ जा.क्र. सा.प्र.वि १/परिषद /३३४/२०२२ अहिल्यानगर दिनांक- २८/०३/२०२२ अन्वये प्रशासक कालावधीत जिल्हा परिषद जिल्हा परिषद स्तरावरील विविध विकास कामे व योजना अंबलबजावणीसाठी निर्णय घेण्यासाठी विविध स्तरांवर सल्लागार समिती नियुक्ती केलीली आहे .त्याअनुषंगाने, जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन

२०२६-२७ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राचे /उपकेंद्राचे /आयुर्वेदिक व युनानी दवाखान्याचे बळकटीकरण करणे या योजनेअंतर्गत **२२१०- । ७१९** लेखाशिर्षांतर्गत रक्कम रु.५० आवश्यक साहित्य साधन सामुग्री, उपकरणे ,लिनन साहित्य ई. खरेदी खर्चास जिल्हा परिषद स्थायी समिती सभा मान्यता देत आहे.

सचिव तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रशासक तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर